अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

खास सभा

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र. १ ( ह ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : १७-७-२००७.

श्री./ श्रीमती........................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( ह ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा शनिवार दिनांक २१-७-२००७ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका व टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

शनिवार दिनांक २१-७-२००७ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहात

होणां-या मा.खास सभेपुढील विषय पत्रिका.

| | |
|---|---|
| १ | दुखवटयाचे प्रस्ताव. |
| २ | सावेडी भागातील प्रोफेसर कॉलनी चौकामध्ये अश्वारूढ संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३ | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचा लाभ देण्याकरीता सर्वेक्षणाद्वारे तयार करण्यात आलेली दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची यादी मा.जिल्हा नागरी विकास यंत्रणेकडे पाठविण्यापुर्वी आमसभेच्या निदर्शनास आणुन देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या निर्मलनगर पाणी पुरवठा योजना प्रस्तावास शासनाच्या तातडीच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत मंजूरी मिळणे कामी सविस्तर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे बाबत ऑफिस रिपोर्ट . |
| ५ | अहमदनगर शहरातील केडगाव प्रभागासाठी नळ पाणीपुरवठा योजनेस मा.शासनाकडुन UIDSSMT योजने अंतर्गत मंजुरी मिळाल्याने मा.शासनाशी करारनामा करणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक १७-७-२००७

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

शनिवार दिनांक २१-७-२००७ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहात होणां-या मा.खास सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

--*--

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | दुखवटयाचे प्रस्ताव. | टिप्पणी नाही. |
| २ | सावेडी भागातील प्रोफेसर कॉलनी चौकामध्ये अश्वारूढ संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| ३ | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचा लाभ देण्याकरीता सर्वेक्षणाद्वारे तयार करण्यात आलेली दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची यादी मा.जिल्हा नागरी विकास यंत्रणेकडे पाठविण्यापुर्वी आमसभेच्या निदर्शनास आणुन देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| ४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या निर्मलनगर पाणी पुरवठा योजना प्रस्तावास शासनाच्या तातडीच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत मंजूरी मिळणे कामी सविस्तर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे बाबत ऑफिस रिपोर्ट . | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| ५ | अहमदनगर शहरातील केडगाव प्रभागासाठी नळ पाणीपुरवठा योजनेस मा.शासनाकडुन UIDSSMT योजने अंतर्गत मंजुरी मिळाल्याने मा.शासनाशी करारनामा करणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस शिफारस आहे. |
| ६ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही. |

दिनांक : १७-७-२००७.
अहमदनगर.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दि.२१-७-२००७.

प्रस्तावाचा विषय - सावेडी भागातील प्रोफेसर कॉलनी चौकामध्ये अश्वारूढ संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**--*--**

प्रस्तावाचा मजकुर - नालेगांव भागातील नेप्तीनाका चौकातील आयलँडमध्ये आश्वरुढ संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे बाबत मा.नगरपालिका ठराव नं. १० दिनांक १०/०९/१९९१ अन्वये सदर कामास व रु.१,२५,०००/- चे खर्चास मंजूरी देणेंत आलेली होती. त्याप्रमाणे मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडेस मंजूरी मिळणे बाबत पत्रव्यवहार केला असता त्यांनी क्रमांक /नपा/कार्या. ६अ/६२५/९४ अ.नगर दि.१९/२/१९९४ अन्वये सदरचा प्रस्ताव अमान्य करणेत आलेला असल्याचे कळविले आहे.

त्यानंतर मा.नगराध्यक्ष साहेब यांनी स्टोअर विभाग दि.४/३/९४ चे प्रस्तावान्वये याकामी फेरनिविदा मागविणेस मंजूरी दिली असुन त्याप्रमाणे वेळोवेळी वर्तमान पत्रातुन फेरनिविदा मागविण्यास आलेल्या होत्या. त्यानुसार १) मे.एस.बी.परदेशी, पुणे २) सुरेश पी.राउत, पुणे या दोन निविदा प्राप्त झाल्या असुन मा.स्थायी समिती ठराव नं.१९ दि.२/८/१९९४ अन्वये मे.एस.बी.परदेशी यांचे कमीचे रु.१,२५,०००/- चे दरास मंजूरी देण्यात आलेली होती. त्याप्रमाणे शिल्पकार मे.एस.बी.परदेशी, पुणे यांनी निविदा डिपॉझिट रक्कम भरुन करारनामा करुन दिलेला आहे.

त्यानंतर मे.एस.बी.परदेशी,पुणे यांना जा.नं.भांडार ३२४१ दि.१९/८/९७ अन्वये सदरच्या पुतळयाचे प्ले मॉडेल कला संचालनालय, मुंबई, यांचेकडून पसंती झालेनंतर पुतळयाची प्रत्यक्ष पाहणी केली जाईल व संमती दिली जाईल. याबाबत कार्यवाही पुर्ण केल्यावर तसे कळविले परंतु मे.एस.बी.परदेशी पुणे यांनी याबाबत अद्यापपर्यंत काहीही कार्यवाही केलेली नाही व महानगरपालिकेस कुठलाही पत्र व्यवहार केलेला नाही. महानगरपालिका ठराव क्रमांक - ४ दि.८/११/०५ अन्वये कार्यवाही करणे बाबत तसेच मा.शासनाचे नियमाप्रमाणे पुतळया बाबत सर्व कार्यवाही करणेत यावी याबाबत मंजूरी दिलेली आहे. तसेच नेप्ती चौक या ठिकाणी पुतळा बसविणे व संभाजी महाराजांचे चौकास नाव देण्याबाबत कार्यवाही करणे बाबत निर्णय झाला आहे.

परंतु मा.नगरसेवक श्री.गिरवले कैलास रामभाउ यांनी दि.२/६/२००७ रोजी यादी देउन धर्मवीर संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा नेप्तीनाका चौक आयलँड या ठिकाणी पुर नियंत्रण रेषा तसेच राष्ट्रीय महामार्ग या चौकामधून जात असल्यामुळे सदर पुतळा पुर्वी सुचविलेल्या ठिकाणाऐवजी प्रोफेसर कॉलनी चौक या ठिकाणी बसविणे बाबत पुनःश्च प्रस्ताव महानगरपालिका सभेपुढे ठेवणे बाबत विनंती केलेली आहे. सदर कामी येणारा खर्च नविन पुतळे बसविणे हया लेखाशिर्षक अंतर्गत करणेत येईल.

तरी सदरचा प्रस्तावास, कामास व खर्चास तसेच मा.शासनाचे परवानगी घेवून कार्यवाही करणेस व निर्णयास्तव रिपोर्ट सादर.

बजेट हेड : नविन पुतळे बसविणे.

तरतुद रू. : २०,००,००० /-

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करणे योग्य वाटते.

यावर अंतर्गत लेखा परीक्षक यांचा अभिप्राय की, शहर अभियंता यांचेकडील प्रस्तावाप्रमाणे मा.शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस हरकत नाही.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार कार्यवाहीसाठी सादर.

यावर श्री.काकडे एम.डी. यांचा अभिप्राय की, चर्चेप्रमाणे मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेणे आहे.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, दि.०२ फेब्रुवारी २००५ च्या शासन निर्णयातील अटीस अधिन राहून पुतळा उभारणेस हरकत नाही. मात्र संबंधित विभागाकडुन पुतळयाच्या जागेचे स्थान दर्शविणारे नकाशे प्राप्त झालेले नाहीत. तथापि संबंधित अभियंत्याशी चर्चा करुन सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर पुतळा उभारणेस या विभागाची हरकत नाही. नकाशात दर्शविलेली जागा महानगरपालिकेच्या मालकीची असुन या जागेवर पुतळा बसविल्यास रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही.

भविष्यात कोणत्याही प्रस्तावासोबत प्रस्तावाचे नकाशे सादर करणे बाबत शहर अभियंता यांना सुचित करावे हि विनंती. मुळ प्रकरणात जागेच्या नावाचा कोणताही उल्लेख नाही. ही जागा नरयो क्रं.४,अं.भु.क्र.१२९ पैकी उत्तरपुर्व कोप-यातील आहे. भविष्यात पत्रव्यवहार करतांना या संपुर्ण जागेचा उल्लेख वरील प्रमाणे करणे आवश्यक आहे.

यावर श्री.काकडे ,शाखा अभियंता यांचा अभिप्राय की, मा.आयुक्त यांचे मंजुरीप्रमाणे प्रस्ताव मा.जनरल बोर्ड पुढे ठेवणेबाबत पुढील तजविज करावी.

यावर मा.महापौर यांचा अभिप्राय की, प्रस्ताव " अ " प्रमाणे महासभेपुढे ठेवणेत यावा.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट शहर अभियंता , अंतगर्त लेखापरिक्षक, मा.उपायुक्त (सा),नगर रचनाकार व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

मा.सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर इतर विषयाची बरीच चर्चा झाली. त्यात मा.श्री.कैलास गिरवले यांनी सुचवले की, अहमदनगर महानगरपालिकेमध्ये कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने चार इंजिनिअर्सची नियुक्ती केलेली आहे. तसेच सध्या महानगरपालिकेत इंजिनिअर्सच्या १२ जागा भरावयाच्या आहेत. कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने नियुक्त केलेल्या ४ इंजिनिअर्स हे महानगरपालिकेचे करीत असलेले कामकाज उदा.एस्टीमेंट,प्लॅन्स,व इतर तदनुषंगिक बाबी अत्यंत उत्तम रितीने पहात असुन उपरोक्त भरावयाच्या १२ जागांपैकी सदर कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने नियुक्त केलेल्या ४ इंजिनिअर्सची कायम नियुक्ती करणे बाबत प्राधान्यक्रमाने विचार व्हावा. सदरबाबत इतरही मा.सदस्यांनी त्यांना अनुमोदन दिले.

१) मा.श्री.कृ.द.जाधव - सभागृहामध्ये इतर विषयावर बरीचचर्चा झाली आहे. तेव्हा आता अजेंडयावरील विषय घ्यावयास पाहिजे. त्याप्रमाणे विषय घ्यावेत असे सुचविले.

२) मा.श्री.सुभाष लोंढे, सभापती, स्थायी समिती - पुतळा बसविणेबाबत यापुर्वी अनेकवेळा ठराव झालेला आहे व पत्रव्यवहार केलेला आहे.

३) मा.श्री.शंकरराव घुले - पुतळा बसविणेबाबत यापुर्वी याबाबत शासनाकडून जे पत्र आलेले आहे त्याची माहिती देण्यात यावी. पत्र दाखवावे.

४) मा.श्री.कैलास गिरवले - विषयामध्ये योग्य कागदपत्राचा उल्लेख केलेला नाही. तो उल्लेख करावा. याबाबत उपमहापौर यांनी खुलासा केला.

५) मा.श्री.शंकरराव घुले - पुर्वी सर्व साधारण सभा होण्याच्या अगोदर खातेप्रमुख व शाखा प्रमुख यांची समन्वय मिटींग घेवून माहिती घेण्याची पध्दत होती. तशी ठेवण्यात यावी म्हणजे कागदपत्राची माहिती घेता येते.

६) मा.श्री.कृ.द.जाधव - सदर जागेवर यापूर्वी इंदिरा गांधी यांचा पुतळा बसविणेबाबतचा ठराव झालेला होता.

७) मा.श्री.दिपक सुळ, उपमहापौर - या जागेवर पुतळा बसविणेबाबत ब-याच वेळा ठराव करण्यात आले. तथापी त्यास मंजुरी मिळालेली नव्हती. व १६ वर्षे या ठिकाणी पुतळा बसविणे शक्य झाले नाही.

८) मा.श्री.भगवान फुलसौंदर - पुतळा बसविणेबाबतची जागा निश्चित करण्यात यावी.

९) मा.श्री.कृ.द.जाधव - प्रोफेसर कॉलनी चौकामध्ये पुतळा बसविण्यास मंजुरी देण्यात यावी, असे सांगितले.

मा.महापौर यांनी ४ फेब्रुवारी २००४ व इतर जी.आर.चा उल्लेख करुन माहिती दिली.

१०) मा.श्री.शंकरराव घुले - धर्मवीर संभाजी महाराज यांचा पुतळा लवकरात लवकर बसविण्यात यावा, अशी विनंती केली. पुतळा कोठे बसविण्यात यावा ही बाब गौण आहे असे त्यांनी सांगितले. प्रोफेसर कॉलनीतील चौकामध्ये पुतळा बसविणेत यावा, याबाबत महापौर व आयुक्त यांना अधिकार देण्यात यावेत व त्यास मंजुरी देण्यात यावी. तसेच त्यास शासनाची मंजुरी घेण्यात यावी, असे सुचविले.

११) मा.श्री.कैलास गिरवले - महानगरपालिकेने महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणेबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यासाठीही योग्य जागा निवडून पुतळा बसविण्यात यावा, तसेच प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संभाजी महाराजांचा आश्वारूढ पुतळया ऐवजी उभा पुर्णाकृती पुतळा बसविणे बाबत ठरावात नमुद करावे असे सुचविले.

१२) मा.श्री.दिप चव्हाण - ठराव मंजुर करावा असे सांगितले.

१३) मा.श्री.शंकरराव घुले - कायदेशीर बाबीबाबत मंजुरी घ्यावी. यापुर्वी स्वातंत्र्यदेवतेचे पुतळे बसविणेबाबत आमच्या काळात मंजुरी दिलेली होती. त्याचीही माहिती घ्यावी.

१४) मा.श्री.अशोक कानडे - महाराणा प्रताप यांचा पुतळा मनमाडरोडवरील पाईपलाईन रोडला जोडणा-या रस्त्यावर मोकळया जागेत बसविण्यात यावा असे सुचविले.

**ठराव :** साधक बाधक झालेली व्यापक चर्चा व सभागृहाचा कल पाहता ठरविण्यांत येते की, ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर. प्रस्तावात नमुद संभाजी महाराजांच्या आश्वारूढ पुतळया ऐवजी उभा पुर्णाकृती पुतळा बसविणे असा बदल करण्यांत यावा व प्रोफेसर कॉलनी येथील चौकात पुतळा उभारणे बाबत तसेच मा.शासनाचे परवानगीसाठी नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव.

अनुमोदक : मा.श्री.अशोक कानडे.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दि.२१-७-२००७.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

प्रस्तावाचा विषय - सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचा लाभ देण्याकरीता सर्वेक्षणाद्वारे तयार करण्यात आलेली दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची यादी मा.जिल्हा नागरी विकास यंत्रणेकडे पाठविण्यापुर्वी आमसभेच्या निदर्शनास आणुन देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकुर - मा.शासनाच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिके मार्फत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना राबविण्यात येते. या योजनेचा लाभ देण्या करीता दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी करणेकरीता सर्वेक्षण मा.आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचा आदेश क्र.नपप्रसं / १४/सर्वेक्षण/२००३/२६४ दि.२५/ऑक्टोबर २००४ तसेच आदेश क्र.नपप्रसं /१४/सर्वेक्षण /२००३/२६४ दि.२ एप्रील २००५ अन्वये करण्यात आले आहे.

हे सर्वेक्षण महानगरपालिका क्षेत्रामध्ये घोषीत अघोषीत झोपडपट्टयांमध्ये, कमी उत्पन्न गटाच्या वस्त्यांमध्ये घरोघरी जाउन करण्यात येईल. घरोघरी सर्वेक्षण न झालेल्या भागासाठी महानगरपालिका पुरेशी प्रसिध्दी देईल. अशा क्षेत्रातील कुटुंब दारिद्रय रेषेखालील असल्यास ते महानगरपालिकेकडे अर्ज सादर करतील. त्यानुसार प्रगणक त्या कुटुंबाच्या घरी भेटी देउन प्रपत्र भरून घेतील. असे उपरोक्त आदेशान्वये निर्देशीत केले होते. त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेने कार्यवाही केलेली असून शहरातील झोपडपट्टया तसेच कमी उत्पन्न असणा-या कुटुंबांच्या वस्त्या येथे घरोघरी जाउन सर्वेक्षण करण्यात आले आहे. उर्वरीत भागात सर्वेक्षणाची, सर्वेक्षण चालू असल्याबाबत माहिती व्हावी याकरीता दिनांक १०/ ८ /२००५ ते दि.१९ / ८ / २००५इतके १० दिवस वाहनावर लाउड स्पिकर बसवून सदरचे वाहन शहराच्या सर्व भागात फिरवून दारिद्रय रेषेखालील कुटुंबांनी त्यांचे सर्वेक्षण होण्याकरीता अर्ज करावेत असे अवाहन करण्यात आले. तसेच ४० कापडी व १० फ्लेक्सचे बॅनर्स या कामी शहरातील मुख्य ठिकाणी लावण्यात आले.

या नंतर ८ पर्यवेक्षक व ८३ प्रगणक यांचे मार्फत दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले.

या सर्वेक्षणाव्दारे भरून घेण्यात आलेल्या कुटुंबांच्या प्रपत्रांचे संगणकीकरण करण्यात आले.यानंतर तयार झालेली प्रारूप यादी सर्व नागरीकांना पहाण्यासाठी तसेच हरकती सुचना नोंदवण्याकरीता दि.८/११/०६ ते २२/ ११/ ०६ या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आली .

सदरची प्रारूप यादी पहाण्यासाठी खुली असल्याबाबत  वर्तमान पत्रातून तसेच रिक्षावर लाउड स्पिकर लावून शहरातील सर्व भागात निवेदन करण्यात आले. सर्वेक्षणाची संधी जास्तीत जास्त कुटुंबांना उपलब्ध व्हावी याकरीता मा.आयुक्त साहेब,अहमदनगर महानगरपालिका यांचे आदेशावरून सदरची मुदत आणखी १५ दिवसांकरता म्हणजेच दि.७/१२/०६ अखेर वाढविण्यात आली.

या कालावधीमध्ये एकूण ४७३६ इतके हरकती अर्ज प्राप्त झाले.या अर्जांची प्रारूप यादीबरोबर पडताळणी केली असता ६०१ हरकतदारांनी प्रारूप यादीत नाव असून देखील अर्ज नोंदविल्याचे दिसून आले. या हरकतदारांना त्यांचे नाव प्रारूप यादीमध्ये असल्याबाबत समक्ष सांगण्यात येउन नाव दाखविण्यात आले.

उर्वरीत ४१३५ इतक्या हरकतदारांच्या कुटुंबांचे सर्वेक्षण ४५ प्रगणकांमार्फत करण्यात आले. यामध्ये ७२३ हरकतदारांचे अपुर्ण व चुकीचे पत्ते असल्याने ते अर्जदार प्रगणकांनी भेट दिली असता तेथे रहात नसल्याचे आढळून आले.

सर्वेक्षणासंदर्भात मा.जिल्हा नागरी विकास यंत्रणा,अहमदनगर यांचेकडे कोणतीही हरकत अथवा सूचना आजमितीस प्रलंबीत नाही असे समक्ष चौकशी करता सांगण्यात आले आहे.

सदर सर्वेक्षणाव्दारे एकूण २०२१६ इतक्या कुटुंबांचे प्रपत्र भरून घेण्यात आले व त्यांचे संगणकीकरण करण्यात आलेआहे. यापैकी ७५२ इतक्या कुटुंबांनी  ते दारिद्रय रेषेखालील नसल्याबाबत सांगीतले आहे.उर्वरीत  १९४६४ इतक्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी संगणकीकृत करण्यात आली आहे. सदरची सी.डी.,मा.जिल्हा नागरी विकास यंत्रणा,अहमदनगर व नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई यांचेकडे सादर करावयाची आहे. सदरची यादी उपरोक्त ठिकाणी पाठविण्यापुर्वी आमसभेच्या निदर्शनास आणून दयावी असे नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे परिपत्रक क्र.नपप्रसं / १४/सर्वेक्षण /२००३ /२६४ दि.८ /४ /२००५ याव्दारे सूचीत करण्यात आले आहे. तसेच आमसभेला या यादीमध्ये कुठल्याही कुटुंबांचा समावेश करता येणार नाही. असे महाराष्ट्र राज्य नागरी विकास यंत्रणा यांनी सर्वेक्षण /क्षेत्रीय अधिकारी /पर्यवेक्षक यांचेसाठी निर्गमीत केलेल्या सूचना पुस्तिकेतील मुद्दा क्र.५५ अन्वये सूचीत केले आहे.

तरी दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची संगणकीकृत यादी सी.डी.व्दारे जिल्हा नागरी विकास यंत्रणा व राज्य नागरी विकास यंत्रणा यांचेकडे सादर करणे पुर्वी आमसभेच्या निदर्शनास्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार सर्वेक्षण सी.डी.आमसभेच्या निदर्शनास्तव सादर करणेस मान्यतेसाठी सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, कार्यालयीन प्रस्तावानुसार व मा.शासनाचे निर्णयानुसार सदरची बाब माहितीस्तव महासभेपुढे ठेवणेत यावी.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

१) मा.श्री.दिप चव्हाण - यांनी चर्चेमध्ये सुचविले की, सदरचा विषय मंजुर करणेस हरकत नाही.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सर्वेक्षणाद्वारे तयार करण्यात आलेली दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची यादी संबंधित शासकीय यंत्रणेकडे पाठविण्यास ही सभा मंजुरी देत आहे.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.सौ.योगिता सत्रे.

अनुमोदक : मा.श्री.किशोर डागवाले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दि.२१-७-२००७.

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिकेच्या निर्मलनगर पाणी पुरवठा योजना प्रस्तावास शासनाच्या तातडीच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत मंजूरी मिळणे कामी सविस्तर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे बाबत ऑफिस रिपोर्ट .

--*--

प्रस्तावाचा मजकुर - महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या निर्मलनगर परिसरात १० लाख लिटर्स क्षमतेची उंच पाण्याची टाकी होणेबाबत मा.श्री. विनित नाथ पाउलबुद्धे , सदस्य अहमदनगर महानगरपालिका यांनी मा.मंत्री पाणी पुरवठा स्वच्छता विभाग यांचेकडेस तद्नुषंगीक विंनती अर्ज सादर केला होता त्यांचे विनंती अर्जानुसार मा.शासनाचे अवरसचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडून संदर्भिय पत्र क्र. १ प्राप्त झाले होते . सदरच्या पत्रात अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील निर्मलनगर परिसरासाठी प्रस्तावित असलेल्या टाकीच्या बांधकामास / योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे किंवा कसे असल्यास त्याची तपशील वार माहिती शासनास तात्काळ सादर करणेविषयी विनंती केली होती . प्रस्तावित योजनेबाबत नागरीकांना सदयस्थितीत वसंतटेकडी येथील जलकुंभातून दाबनलिकेव्दारे तेथील १ लाख लिटर्स क्षमतेच्या टाकीत पंपींग करून पाणी पुरवठा करण्यात येतो, परंतू सदर भागात सातत्याने वाढत असलेल्या लोकसंख्येचा विचार करता आता तेथे जवळजवळ २० ते २२ हजार लोकसंख्या असल्याने तेथील नागरीकांना नियमीत व पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नाही. त्यामुळे तेथील नागरीकांच्या दैनंदिन तक्रारी महानगरपालिकेकडे येत असल्याने याविषयी तातडीने निर्णय घेवून सदर भागासाठी स्वतंत्र उंच पाण्याची टाकी उभारणेचे धोरण आखून त्या उंच टाकीतून सदर भागात पाणी पुरवठा केल्यास तेथील नागरीकांना नियमीत व पुरेसे दाबाने पाणी पुरवठा करता येईल व कायमस्वरूपी पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल, या उद्देशाने उंच टाकी बांधणेचे प्रस्तावित करून त्यानुसार सर्वेक्षण महानगरपालिकेमार्फत हाती घेवून पूर्ण करण्यात आले आहे. त्यानुसार १० लाख लिटर्स क्षमतेची उंच टाकीचे व अनुषंगीक कामांचे अंदाजपत्रक रूपये ७०,४२,०००/- महानगरपालिकेमार्फत तयार करणेत आले होते. तसेच सन २००६-२००७ चे अंदाजपत्रकात ही निर्मलनगर / सुर्यानगर या भागासाठीच्या पा.पु.योजनेचा/ पाण्याच्या टाकीचा समावेश करण्यात आलेला आहे.

वरिलप्रमाणे तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकासह सविस्तर प्रस्ताव पत्र क्रं.पा.पु. ७३४ दि. १३/९/२००६ नुसार मा.शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसह योजना मंजुर करणेसाठी यापूर्वी सादर करणेत आलेला आहे तसेच मा. जिल्हाधिकारी साहेब जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांचेकडून नुकतेच संदर्भिय पत्र क्र. १ इकडेस प्राप्त झालेले होते. त्यामध्ये त्यांनी मा.नगरसेवक श्री.विनीत पाउलबुद्धे साहेब यांनी मा.मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग , मंत्रालय , मुंबइ यांना अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २ मधील पिण्याच्या पाण्याच्या समस्ये बाबत लिहिलेल्या पत्राची छांयाकीत प्रत महानगरपालिकेस पाठवून त्याअनुषंगाने त्वरीत योग्यती कार्यवाही करणेबाबत इकडेस सूचित केले होते.

सदर पत्रामध्ये (संदर्भिय पत्र क्र. २) मा.नगरसेवक श्री.विनीत पाउलबुद्धे यांनी अहमदनगर महानगरपालिकेचा प्रभाग क्र. २ च्या परिसरात पाणी पुरवठा कमी दाबाने व अनियमित रित्या होत असल्याने या भागात पाण्याची तीव्र टंचाई भासत असल्याचे वरील पत्रान्वये श्री . मा.नगरसेवक श्री.विनीत पाउलबुद्धे साहेब यांनी शासनाचे निदर्शनास आणले असून या परिसरात निर्मलनगर येथे स्वतंत्र १० लाख लीटरची टाकी बसविण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे .नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या तातडीच्या पाणी पुरवठा योजनेसंदर्भात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील दि. २ फेब्रु १९९९ च्या शासन निर्णयान्वये स्थायी आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत .तसेच शासन परिपत्रक क्र. टंचाई २००६ / प्र.क्र.२२१ / पा.पु./१४ दि.४ नोव्हेंबर २००६ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत .त्या सुचना विचारात घेउन वर नमुद केलेल्या परिसरातील पिण्याच्या पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना करण्याबाबत रितसर प्रस्ताव विहीत मार्गाने शासनाच्या मान्यतेसाठी तात्काळ सादर करणे विषयी विनंती केलेली होती.

यास्तव निर्मलनगर भागासाठी प्रस्तावित योजनेस संदर्भिय शासनाकडील पत्रान्वये महानगरपालिकेमार्फत नव्याने तयार करण्यात आलेल्या सुधारित अंदाजपत्रक (अंदाजपत्रक रूपये ८०,०३,०४३/-) /आराखडयास शासन परिपत्रक क्र. टंचाई २००६/ प्र.क्र.२२१ / पा.पु./१४ दि.४ नोव्हेंबर २००६ निकषाप्रमाणे नागरी क्षेत्रातील पिण्याचे पाणी टंचाई निवारणार्थ तातडीचे पाणी पुरवठा योजनेअंतर्गत समावेश करून प्रशासकीय / अंदाजपत्रकीय मान्यता व योजना मंजूरीसाठी सदरचा प्रस्ताव विहीत मार्गाने महानगरपालिकेचे पत्र क्रं.पा.पु.१७१ दि.७/६/२००७ अन्वये मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडेस सादर करण्यात आलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या निर्मलनगर पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडून पत्र क्रं.सुजयो/वशि/३७१ दि. /६/२००७ अन्वये विभागीय आयुक्त ,नाशिक विभाग यांचेकडेस सादर केलेला आहे.सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त यांचे कार्यालयात योजनेच्या प्रस्तावाची छाननी करून शासन निर्णयानुसार प्रस्तावातील खालील नमुद केल्या प्रमाणे त्रुटीची पूर्तता करणे बाबत मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेमार्फत अहमदनगर महानगरपालिकेस निर्देशित केलेले आहे. त्यानुसार खालील प्रमाणे मा.महासभेच्या मंजूरीने ठराव करून मा.शासनास सादर करणे गरजेचे आहे.

१) प्रस्तावित योजनेच्या एकूण किमतींच्या १० % लोकवर्गणी महानगरपालिका भरण्यास तयार असल्याबाबतचा ठराव .

२) योजनेची पुढील देखभाल दुरूस्ती करण्यास महानगरपालिका तयार असल्याबाबतचा ठराव ,पाण्याचे आरक्षण केले असल्यास तसा ठराव .

३) प्रस्तुत योजनेस व योजनेसाठीच्या खर्चास मंजुरी दिलेबाबतचा महानगरपालिकेचा ठराव .

तरी वरील बाबींची (त्रुटींची) पुर्तता करणेकामी तसेच प्रस्तावित योजना मा.शासनाकडून मंजुर होणेसाठी प्रस्तावित योजनेच्या एकुण किंमतीच्या १० टक्के लोकवर्गणी भरणेबाबतचा, योजनेची पुढील देखभाल दुरूस्ती करण्यास तयार असलेबाबतचा, तसेच प्रस्तुत योजनेस व योजनेसाठीच्या खर्चास मंजुरी देणेबाबत इत्यादी निर्देशित बाबींचा ठराव मा.शासनास सादर करणे करिता सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयासाठी / मंजुरीसाठी ठेवणे उचित राहिल .

तथापी आपले आदेशार्थ ऑफीस रिपोर्ट सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे सदरचा विषय मा.सर्वसाधारण सभेपुढे निर्णयास्तव ठेवणेबाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सदर प्रस्ताव ४-११-०६ रोजीच्या जी.आर.नुसार आहे का ? व तसेच इतर सर्व अटीपुर्ण आहेत का ? याचा तसेच सदर भाग UIDSSMT या योजनेअंतर्गत घेण्यात आलेला आहे का ? खुलासा करावा.

यावर मेकॅनिकल इंजिनिअर,पा.पु. यांचा खुलासा की, सदर प्रस्ताव मा.शासन निर्णय क्रमांक महाराष्ट्र शासन पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग परिपत्रक क्र.टंचाई - २००६ / प्र.क्र.२२१ / पा.पु.१४ मंत्रालय , मुंबई दिनांक ०४ नोव्हेंबर २००६ अंतर्गत " विशेष बाब " म्हणुन सादर करणेत

आलेला आहे. तसेच शासन निर्णयातील अटी पुर्ण करण्याचे दृष्टीने महानगरपालिकेच्या ठरावाची आवश्यकता असल्याने सादर करणेत आलेला आहे.

सदर भाग UIDSSMT अंतर्गत अंतर्भुत करणेत आलेला आहे. परंतु मा.जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्र.नपा / कार्या - ६ अ / ९३९ दिनांक ६-६-२००७ चे पत्र व मा.नगरसेवक श्री.विनित पाउलबुध्दे यांनी मा.मंत्री , पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांना लिहीलेले पत्र यांचे अनुषंगाने तथा मा.उपायुक्त साहेब यांनी दिलेल्या सुचनेनुसार तातडीच्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यांत आलेला आहे. वरील दोन्ही योजनेपैकी ज्या योजनेस मंजुरी मिळेल ती सोडुन इतर योजनेतुन वगळण्यात येईल.

तथापि आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की मेकॅनिकल इंजिनिअर यांनी केलेल्या खुलाशानुसार सदरचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे निर्णयास्तव योग्य होईल तरी आदेशार्थ सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, सर्वसाधारण सभेत सादर करा.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा),मा.आयुक्त साहेब,मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह व मेकॅनिकल इंजिनिअर यांचे खुलाशासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

१) मा.श्रीमती.वर्षा आरिफ - यापुर्वी आम्ही काही प्रस्ताव दिले होते त्याबाबतही गांभिर्याने विचार करावा.

२) मा.श्री.अशोक कानडे - हद्दवाढीतील भागाचाही याबाबत कशाप्रकारे सामावेश करण्यात आलेला आहे, याचा खुलासा करावा.

हद्दवाढीच्या भागातील ९५% ओपनेस्पेस जागेचे हस्तांतरण झालेले नाही. त्याबाबतही कार्यवाही करुन घेणे आवश्यक आहे. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला.

३) मा.श्री.उडाणशिवे - झोपडपटटया घोषीत करणेबाबतचा प्रश्न उपस्थित करताना सांगितले की, अघोषीत झोपडपटटयांचे जागांचे हस्तांतरण करुन घेउन अघोषीत झ ोपडपटटया

घोषीत करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. त्यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, याबाबतची प्रोसेस कार्यवाही चालु आहे.

४) मा.श्री.दिप चव्हाण - मा.श्री.विनित पाउलबुधे, सदस्य यांनी हा विषय सर्व साधारणसभेपुढे आणलेला आहे. त्यासाठी शासन दरबारी चांगला प्रयत्न केला व पाठपुरावा केला व नागरिकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न याठिकाणी सोडविलेला आहे. त्यांचे मी अभिनंदन करतो.

५) मा.श्री.शंकरराव घुले - हा प्रस्ताव सभागृहापुढे आणण्यासाठी मा.श्री.विनित पाउलबुधे, सदस्य यांनी जो पाठपुरावा केला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी निर्मलनगर, सुर्यनगर येथील नागरिकांकरीता विशेषतः मध्यमवर्गीयांकरिता जी योजना राबविली आहे त्यास मंजुरी देण्यात यावी.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

निर्मलनगर पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावित खर्चास योजनेच्या एकुण किंमतीच्या १० टक्के लोकवर्गणी भरण्यांस व योजनेची पुढील देखभाल व दुरूस्ती करण्यांस ही सभा तत्वतः मान्यता देत आहे.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.पाउलबुधे विनित नाथ.

अनुमोदक : मा.सौ.पवार संध्या बाळासाहेब.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दि.२१-७-२००७.

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर शहरातील केडगाव प्रभागासाठी नळ पाणीपुरवठा योजनेस मा.शासनाकडुन UIDSSMT योजने अंतर्गत मंजुरी मिळाल्याने मा.शासनाशी करारनामा करणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकुर - केडगाव प्रभागासाठी प्रस्तावित असलेली सुधारीत पाणी पुरवठा योजना केंद्रशासनाच्या 'UIDSSMT' योजने अंतर्गत समावेश करणेविषयी संमती दर्शविणारा ठराव क्र. ५ दि.१३/९/२००६ महानगरपालिकेने पारीत करून तो महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळास सादर करण्यात आलेला होता.

सदर ठरावाचे अनुषंगाने केडगाव प्रभागाकरीता पाणी पुरवठा योजना 'UIDSSMT' अंतर्गत राबविण्याचे दृष्टीने महाराष्ट्र जीवन प्राधिकण मंडळाकडून सदर योजनेची अंदाजपत्रके व आराखडे तयार करणेत आली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडून तयार करणेत आलेली अंदाजपत्रके व आराखडे मा.केंद्रशासीत पुरस्कृत लहान व मध्यम शहरांसाठी पायाभुत सुविधांचा विकास 'UIDSSMT' अंतर्गत अंमलबजावणीसाठी तसेच मंजूरीबाबत पुढील कार्यवाही होणेसाठी मा. सहाय्यक संचालक तथा आयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचनालय, मुंबई यांचेकडेस सादर करणेत आलेला होता.विषयांकीत योजनेसाठी ४ थी राज्यस्तरीय मान्यता समितीची बैठक दि. ४/५/२००७ रोजी झालेली असून सदर समितीने सदरहू योजनेस मंजूरी दिलेली असून सदरचा प्रस्ताव मा. केंद्र शासनाकडे पुढील कायर्वाहीसाठी सादर केलेला आहे. त्याविषयीचे संदर्भ्रीय पत्र महानगरपालिकेस नुकतेच प्राप्त झालेले आहे. याअनुषंगाने मा.केंद्र शासनाशी करारनामा करणेकामी महानगरपालिकेकडून, महानगरपालिकेचे उत्पन्न वाढी संदर्भात करण्यात आलेल्या अथवा करण्यात येणा-या प्रयत्न/सुधारणा या ठराव स्वरूपात हवे आहेत. यात प्रामुख्याने प्रॅापर्टी टॅक्स, भाडे तत्वावरील गाळेभाडे, पाणीपट्टी ,ड्रेनेज टॅक्स तसेच महानगरपालिकेने केलेल्या /करण्यात येणा-या इतरही सुधारणा यांचा समावेश आहे.

सध्या १) Property Tax या प्रकारात महानगरपालिकेने सन २००६-०७ या वर्षात खालील प्रमाणे सुधारणा केलेल्या आहे.

अ) अहमदनगर महानगनपालिकेने सन २००५ - २००६ या वर्षामध्ये कर आकारणी व कर संकलनासाठी सुसूत्रता द्यावी या दृष्टीकोनातून कर आकारणी करणेसाठी एकूण ५ झोन प्रस्तावित केलेले आहेत.

ब ) सदर झोन प्रस्तावित केल्याने कर संकलना मध्ये वाढ झालेली दिसून येते .

क) सन २००४ -२००५ या वर्षामध्ये व त्या अगोदरच्या कर आकारणी वर बरेचशे मालमत्ता धारक यांनी मा.न्यायालयात टॅक्स बाबत दावे दाखल केलेले होते . त्यामुळे महानगरपालिकेची कराची रक्कम वसूल होत नव्हती .सन २००५ -२००६ या वर्षामध्ये तत्कालीन मा.आयुक्त साहेब यांनी पुढाकार घेवून मा.जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अहमदनगर यांच्या अनुमतीने मा.न्यायालयामध्ये असलेले प्रलबिंत दावे तडजोडीने निकाली काढण्यात आले .त्यामुळे कराची वसूली मोठया प्रमाणात झाली

ड) अहमदनगर महानगरपालिकेच्या घरपट्टीबाबत माहिती दर्शविणारी वेबसाईट शहरातील मालमत्ता धारकांना घरबसल्या माहिती घेता येईल अशी माहिती महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली.

इ) अहमदनगर महानगरपालिकेने व्यवसायिक मालमत्ता धारक यांना जाचक वाटणा-या कर आकारणी बाबत सुधारणा करून हॉटेल लॉजिंग , हॉस्पीटल इत्यादी साठी श्रेणी निश्चित करून कर आकारणी मध्ये सुसूत्रता आणण्यात आली . तसेच मंगल कार्यालये , पेट्रोल पंप , चित्रपटगृहे इत्यादी व्यवसायिक मालमत्तेवर कर आकारणीची पध्दत बदलून त्यात सुसूत्रता आणण्यात आली .

ई ) त्यामुळे per capita tax रूपये ४२४.४८ लक्ष येतो.

वरीलप्रमाणे कळविणे योग्य होईल .

२) पाणी पट्टीत महानगरपालिकेने सन २००३-०४ मध्ये सुधारणा केलेल्या असल्याने त्याप्रमाणे कळविणे योग्य.

तसेच नुकतीच महानगरपालिकेने शहरात मीटरींग पध्दत व्यापारी वापराच्या नळ धारकांकरीता लागू केलेली असून त्याप्रमाणे कळविणे योग्य.सर्व नळ कोंडाळे सन १९९७ पासून नव्याने देणे बंद असून टप्प्या टप्प्याने सार्वजनिक नळ कोंडाळे बंद करण्यात येवून , ग्रुप कनेक्शन देण्यात येतील, याबाबत कळविणे योग्य.

- Severage charge करीता नव्याने By-lawas बनविणे योग्य.

- तसेच महानगरपालिकेमार्फत दुहेरी लेखा पध्दतीचा अवलंब करण्याचे काम प्रगतीपथावर असून त्याप्रमाणे कळविणे योग्य.

३) संपूर्ण योजनेच्या १०% लोकवर्गणीची रक्कम महानगरपालिका मा. शासनाच्या धोरणानुसार भरेल याप्रमाणे ग्वाही देणे जरूरीचे आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.केंद्र शासनाशी करारनामा करणेसाठी मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेविषयी आदेशार्थ ऑफीस रिपोर्ट सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ " प्रस्तावित मा.महासभेसमोर निर्णयाकरीता ठेवणे योग्य.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

**चर्चा :**

१) मा.श्री.दिप चव्हाण - सदर विषय मंजुर करावा असे सुचविले.

तसेच मा.श्री.किशोर डागवाले, सभागृहनेते, मा.श्री.आसाराम कावरे, सदस्य यांनी विषय मंजूर करणेबाबत सुचना केली. त्याचप्रमाणे मा.श्री.शंकरराव घुले यांनी विषयाची योजना मराठीमध्ये विषद करत जावी, असे सुचविले. त्याचप्रमाणे मा.श्री.सुनिल कोतकर यांनी केडगांव भागासाठी ड्रेनेज योजना राबवावी असे सुचविले असता मा.उपमहापौर यांनी याबाबत खुलासा केला की, सदर ठिकाणची पाणी योजना होउ दया. मग ड्रेनेज योजनेचे पाहू.

२) मा.श्री.भगवान फुलसौंदर - यांनी सुचविले की, संपूर्ण पाणी योजनेसाठी एकच इंजिनिअर नेमावा. यावर मा.उपमहापौर यांनी खुलासा केला की, नवीन नेमलेल्या इंजिनिअरपैकी एक जल अभियंता नेमण्यात येईल.

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी. या योजनांसाठी मा.शासनाच्या निर्देशानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही व करारनामे करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. तद्नुषंगिक खर्च मंजूर.

## मालमत्ता कर

- अहमदनगर महानगरपालिकेने सन २००६ -२००७ मध्ये मालमत्ता करात सुधारणा / बदल करून खालीलप्रमाणे उपक्रम हाती घेण्यात आलेले आहेत .

अ) अहमदनगर महानगरपालिकेने सन २००५-२००६ पासून मालमत्ता धारकांकडून जास्तीत जास्त कर वसूल होणेचे दृष्टीने समन्वयातून झोन पद्धत लागू करण्यात आलेली असून त्यामध्ये शहराचे ५ झोन तयार केलेले आहेत

ब ) प्रस्तावित झोन पद्धतीमुळे मालमत्ता धारकांकडून महानगरपालिकेचे कर वसूलीमध्ये प्रमाणात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे.

क ) सन २००४- २००५ पर्यंत अहमदनगर महानगरपालिका व मालमत्ता धारक यांच्यामध्ये मालमत्ता कराबाबत ब-याच वर्षापासून प्रलंबित असलेले न्यायालयीन वादामुळे त्यांचेकडील मोठया प्रमाणात थकीत असलेली कराची रक्कम वसूल होत नव्हती . त्यामुळे सदरचे प्रलंबित वादावर सर्वमान्य तोडगा काढण्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे संयुक्तीक विदयमाने लोकन्यायालयाचे आयोजन करून त्या अंतर्गत मालमत्ता धारकांची जास्तीत जास्त प्रकरणे समोपचाराने तडजोड करून निकाली काढण्यात आली. त्यामुळे सन २००५ - २००६ मध्ये ब-याच प्रमाणात थकीत कराचे वसुलीत उत्पन्नात वाढ झाली .

ड ) मालमत्ता धारकास मालमत्ता कराबाबत घरबसल्या माहिती मिळावी. या उद्देशान अहमदनगर महानगरपालिकेने स्वतःची वेबसाईट कार्यरत करण्यात आली. त्यामुळे नागरिकांना सहजासहजी स्वतःची मालमत्ता कराची माहिती घरबसल्या मिळून त्याबाबत असलेल्या तक्रारीचे वेळीच निरसण होउन नियमीत वसूली होण्यास मदत झाली .

इ ) अहमदनगर महानगरपालिकेने मालमत्ता कर वाढीसाठी व्यवसायीक वापर मालमत्तांचे विभाजन करून त्यामध्ये हॅाटेल, लॅाजींग , पेट्रोल पंप, मंगल कार्यालय, इत्यादी मालमत्तास स्वतंत्र करआकारणी लागू केलेली आहे.

वरील पद्धतीचा अवलंब केल्यामुळे मालमत्ता धारकाचे समाधान होवून काही शंका कु शंका न येता त्यांचेकडून नियमित टॅक्सचा भरणा होत आहे. आणि सद्दस्थितीत दरडोई कराचे उत्पन्न रू. ४२५/- इतके येत असून ते पुढील वर्षात म्हणजे सन २००८- २००९ मध्ये रू. ५५०/- इतक्या पर्यंत वाढ होईल असा महानगरपालिकेचा उद्देश राहिल .

- अहमदनगर महानगरपालिकेने सन २००४ - २००५ व सन २००५ ञ २००६ मध्ये सर्व मालमत्ताचे सर्वेक्षण करून त्याप्रमाणे नोंदी घेवून अद्यावत मालमत्ता कर रजिस्टर तयार करण्यात आले आहे. या पद्धतीचा अवलंब केल्यामुळे अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने एखादी मालमत्ता तयार झाली तर त्याबाबत लगेच माहिती होवून त्वरीत रजिस्टरला नोंद घेण्यात येवू शकेल .

- चालू आर्थिक वर्षापासून मालमत्ता कराचे उत्पन्नात जवळपास ८४ % पर्यंत वाढ झाली आहे.व यापूढेही खालीलप्रमाणे वाढ होईल याबाबत नमूद करित आहे.

| | |
|---|---|
| सन २००७- २००८ | ८८ % |
| सन २००८ - २००९ | ९२ % |
| सन २००९ - २०१० | ९४ % |

भाडे तत्वावरील गाळेधारक

- अहमदनगर महानगरपालिकेच्या गाळेधारकांची भाडयाची मुदत दि.३१/३/२००७ रोजी संपलेली आहे. सदरच्या भाडयात वाढ करून नविन पद्धतीने ६ महिन्याकरिता भाडे आकारणे पद्धतीचा अवलंब करण्यात आला .
- तसेच नविन भाडे तत्वावर देण्यात येणारे गाळयांसाठी लिलाव पद्धत , ठराविक केसेस बाबतीत मा.शासनाकडील नियमांचा आधार घेण्यात येत आहे.

पाणी पुरवठा आणि सेव्हरेज

पाणी पुरवठयाबाबत खालीलप्रमाणे सुधारणा हाती घेवून त्याची अमंजबजावणी करण्यात आलेली आहे.

- सन २००७ - २००८ या आर्थिक वर्षापासून शहरातील सर्व व्यापारी ग्राहकांचे कनेक्शनला मीटर पद्धतीने पाणी पुरवठा करण्याचे चालू करण्यात आलेले आहे .
- घरगुती वापराचे पाण्यासाठी रू.२२००/- इतके चार्जेस असून बिगर घरगुती वापरासाठी रू. ६१००/- इतके चार्जेस आकारले जातात.
- सद्यस्थितीत घरगूती कनेक्शनसाठी रू.१५००/- इतकी अनामत रक्कम घेतली जाते . आणि बिगर घरगूती कनेक्शनसाठी रू. ५४००/- इतकी अनामत रक्कम घेतली जाते.

| वापर | सध्याचे दर रू. | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| घरगूती | | |
| १/२ " | १५००/- | २०००/- |
| ३/४" | ३०००/- | ४०००/- |
| १" | ६०००/- | ७५००/- |
| मीटर पद्धतीने | ५/ प्रति १००० लीटर | ७.५० प्रति १००० लीटर |
| व्यापारी | | |
| १/२ " | ५४००/- | ६२००/- |
| ३/४" | १०,८००/- | १२०००/- |
| १" | २२,०००/- | २५०००/- |
| मीटर पद्धतीने | १५/ प्रति १००० लीटर | २०/- प्रति १००० लीटर |
| औदयोगिक | | |
| १/२ " | १०,८००/- | १२२००/- |
| ३/४" | २१,६००/- | २५५००/- |
| १" | ४३,२००/- | ४६०००/- |
| मीटर पद्धतीने | २०/- प्रति १००० लीटर | ४०/- प्रति १००० लीटर |

वरीलप्रमाणे दर आकारणी करून ही अहमदनगर महानगरपालिकेस त्यातून १००% पूर्णपणे योजनेचा खर्च भागू शकत नाही . त्यामुळे वरील प्रस्तावित केलेल्या दराप्रमाणे वाढ केल्यास किमान पाणी पुरवठा योजनेचा १०० % खर्च भागू शकेल .

अहमदनगर महानगरपालिकेने सन १९९९ पासून शहरातील सार्वजनिक नळ कोंडाळेची संख्या कमी करून त्याऐवजी ग्रुप कनेक्शन देणेसाठी टप्पाटप्याने आता पर्यंत

८५० नळ कोंडाळे बंद करण्यात आलेले आहेत आणि उर्वरीत २८५ नळ कोंडाळे ही सन २००८ - २००९ पर्यंत मध्ये पूर्णपणे बंद करण्यात येतील .

- ड्रेनेज टॅक्स आकारणी साठी स्वंतत्र नियमावली तयार करण्यात आलेली आहे .
- सन २००७-२००८ पासून ड्रेनेज टॅक्स चे माध्यमातून ड्रेनेजचा खर्च भागविण्यात येत आहे.

प्रस्तावित प्रकल्पांच्या अंमलबजावणी बाबत .

अहमदनगर महानगरपालिका काही प्रकल्प भाडे तत्वावर खाजगी तत्वावर देण्याची आखणी SLNA च्या ठरवून दिलेल्या चौकटीत बसवून करण्याचे योजीत आहे .आणि हे सर्व करताना स्पर्धात्मक निविदेच्या दरानुसार करण्याचे योजिले आहे. प्रकल्पांची देखभाल व दुरूस्ती कार्यक्षम पणे आणि कमी खर्चात होणे अपेक्षित आहे. सन २००७-२००८ साठी पाणी पुरवठा प्रकल्पाचे कामकाज खाजगी तत्वावर खाजगी संस्थ्ांच्या सहकार्यातून करण्याचे महानगरपालिकेने मंजूर केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेची सध्याची पद्धतीचा अवलंब केलेला आहे .उदा .

- एप्रिल २००७ पासून दुहेरी लेखा पद्धतीचा अवलंब केलेला आहे.
- २००७-२००८ पासून शहरातील गरीब वर्गासाठी जागतिक प्राथमिक सेवा पुरविणे
- संगणकाद्वारे खालील प्रकारच्या कार्यपद्धतीची अंमलबजावणी केलेली आहे.

| कार्यप्रकाराची यादी | ध्येय वर्षे | शेरा |
|---|---|---|
| मालमत्ता कर व्यवस्थापन आणि GIS च्या माध्यमांतून सुधारणा करणे | २००७-२००८ | सन २००६-२००७ पासून चालू |
| पाणी पट्टीची वसूली | २००७-२००८ | सन २००६-२००७ पासून चालू |
| Public Grievancs Redressal | २००७-२००८ | सन २००७-२००८ पासून चालू |
| दाखला देणेसाठी एक खिडकी योजना पद्धत | २००७-२००८ | सन २००४-२००५ पासून चालू |
| प्रशासकीय इमारतीसचे नकाशा / आराखडे मंजूरी प्रधान | २००८-२००९ | सन २००७-२००८ पासून प्राथमिक स्वरूपात काम चालू |

अहमदनगर महानगरपालिका स्वतःच्या उत्पन्नातून निधी उपलब्ध करून आवश्यक असलेल्या १०% लोकवर्गणीचा हिस्सा वेळोवेळी भरेल . कदाचित सदरचा हिस्सा / वर्गणी भरणेस विलंब झाला तर अहमदनगर महानगरपालिका सदरचा विलंब आकार निर्देशित केल्याप्रमाणे भरण्यास तयार राहिल . तसेच सभेमध्ये झालेल्या साधक-बाधक चर्चेनुसार या योजनेअंतर्गत तयार करणेत आलेले शहर पाणी पुरवठा (अंदाजीत खर्च रुपये ११७.३० लाख) योजना सुधारीत करणेसह वितरण व्यवस्था नविन करणे,मलनिस्सारण

योजना (अंदाजीत खर्च ६३.४२ लाख ) शहरातील मुख्य अंतर्गत रस्ते (अंदाजीत खर्च १४५.०३ लाख ) व केडगांव मलनिस्सारण योजना खर्चास मान्यता देण्यात येत आहे.तांत्रीक मान्यतेनुसार खर्च कमी / जास्त झाल्यासही त्यास मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सूचक : मा.श्री. कृष्णा दत्तात्रय जाधव

अनुमोदक : मा.श्री . सुनिल रामदास कोतकर

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दि.२१-७-२००७.

.................................................................

प्रस्तावाचा विषय - मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

**--*--**

प्रस्तावाचा मजकुर -

## सर्व साधारण सभा दि.२१-७-०७

मा.सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर इतर विषयाची बरीच चर्चा झाली. त्यात मा.श्री.कैलास गिरवले यांनी सुचवले की, अहमदनगर महानगरपालिकेमध्ये कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने चार इंजिनिअर्सची नियुक्ती केलेली आहे. तसेच सध्या महानगरपालिकेत इंजिनिअर्सच्या १२ जागा भरावयाच्या आहेत. कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने नियुक्त केलेल्या ४ इंजिनिअर्स हे महानगरपालिकेचे करीत असलेले कामकाज उदा.एस्टीमेंट,प्लॅन्स,व इतर तद्नुषंगिक बाबी अत्यंत उत्तम रितीने पहात असुन उपरोक्त भरावयाच्या १२ जागांपैकी सदर कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने नियुक्त केलेल्या ४ इंजिनिअर्सची कायम नियुक्ती करणे बाबत प्राधान्यक्रमाने विचार व्हावा. सदरबाबत इतरही मा.सदस्यांनी त्यांना अनुमोदन दिले.

विषय क्र.२ - सावेडी भागातील प्रोफेसर कॉलनी येथे संभाजी महाराज यांचा पुतळा बसविणे.

१) मा.श्री.कृ.द.जाधव - सभागृहामध्ये इतर विषयावर बरीचचर्चा झाली आहे. तेव्हा आता अजेंडयावरील विषय घ्यावयास पाहिजे. त्याप्रमाणे विषय घ्यावेत असे सुचविले.

२) मा.श्री.सुभाष लोंढे, सभापती, स्थायी समिती - पुतळा बसविणेबाबत यापुर्वी अनेकवेळा ठराव झालेला आहे व पत्रव्यवहार केलेला आहे.

३) मा.श्री.शंकरराव घुले - पुतळा बसविणेबाबत यापुर्वी याबाबत शासनाकडून जे पत्र आलेले आहे त्याची माहिती देण्यात यावी. पत्र दाखवावे.

४) मा.श्री.कैलास गिरवले - विषयामध्ये योग्य कागदपत्राचा उल्लेख केलेला नाही. तो उल्लेख करावा. याबाबत उपमहापौर यांनी खुलासा केला.

५) मा.श्री.शंकरराव घुले - पुर्वी सर्व साधारण सभा होण्याच्या अगोदर खातेप्रमुख व शाखा प्रमुख यांची समन्वय मिटींग घेवून माहिती घेण्याची पध्दत होती. तशी ठेवण्यात यावी म्हणजे कागदपत्राची माहिती घेता येते.

६) मा.श्री.कृ.द.जाधव - सदर जागेवर यापूर्वी इंदिरा गांधी यांचा पुतळा बसविणेबाबतचा ठराव झालेला होता.

७) मा.श्री.दिपक सुळ, उपमहापौर - या जागेवर पुतळा बसविणेबाबत ब-याच वेळा ठराव करण्यात आले. तथापी त्यास मंजुरी मिळालेली नव्हती. व १६ वर्षे या ठिकाणी पुतळा बसविणे शक्य झाले नाही.

८) मा.श्री.भगवान फुलसौंदर - पुतळा बसविणेबाबतची जागा निश्चित करण्यात यावी.

९) मा.श्री.कृ.द.जाधव - प्रोफेसर कॉलनी चौकामध्ये पुतळा बसविण्यास मंजुरी देण्यात यावी, असे सांगितले.

मा.महापौर यांनी ४ फेब्रुवारी २००४ व इतर जी.आर.चा उल्लेख करुन माहिती दिली.

१०) मा.श्री.शंकरराव घुले - धर्मवीर संभाजी महाराज यांचा पुतळा लवकरात लवकर बसविण्यात यावा, अशी विनंती केली. पुतळा कोठे बसविण्यात यावा ही बाब गौण आहे असे त्यांनी सांगितले. प्रोफेसर कॉलनीतील चौकामध्ये पुतळा बसविणेत यावा, याबाबत महापौर व आयुक्त यांना अधिकार देण्यात यावेत व त्यास मंजुरी देण्यात यावी. तसेच त्यास शासनाची मंजुरी घेण्यात यावी, असे सुचविले.

११) मा.श्री.कैलास गिरवले - महानगरपालिकेने महाराणा प्रताप यांचा पुतळा बसविणेबाबत मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यासाठीही योग्य जागा निवडून पुतळा बसविण्यात यावा, असे सुचविले.

१२) मा.श्री.दिप चव्हाण - ठराव मंजुर करावा असे सांगितले.

१३) मा.श्री.शंकरराव घुले - कायदेशीर बाबीबाबत मंजुरी घ्यावी. यापुर्वी स्वातंत्र्यदेवतेचे पुतळे बसविणेबाबत आमच्या काळात मंजुरी दिलेली होती. त्याचीही माहिती घ्यावी.

१४) मा.श्री.अशोक कानडे - महाराणा प्रताप यांचा पुतळा मनमाडरोडवरील पाईपलाईन रोडला जोडणा-या रस्त्यावर मोकळया जागेत बसविण्यात यावा असे सुचविले.

विषय क्र.३ - सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना.

२) मा.श्री.दिप चव्हाण - यांनी चर्चेमध्ये सुचविले की, सदरचा विषय मंजुर करणेस हरकत नाही.

विषय क्र.४ - निर्मलनगर पाणीपुरवठा योजना.

१) मा.श्रीमती.वर्षा आरिफ - यापुर्वी आम्ही काही प्रस्ताव दिले होते त्याबाबतही गांभिर्याने विचार करावा.

२) मा.श्री.अशोक कानडे - हद्‌दवाढीतील भागाचाही याबाबत कशाप्रकारे सामावेश करण्यात आलेला आहे, याचा खुलासा करावा.

हद्‌दवाढीच्या भागातील ९५% ओपनेस्पेस जागेचे हस्तांतरण झालेले नाही. त्याबाबतही कार्यवाही करुन घेणे आवश्यक आहे. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला.

३) मा.श्री.उडाणशिवे - झोपडपटटया घोषीत करणेबाबतचा प्रश्न उपस्थित करताना सांगितले की, अघोषीत झोपडपटटयांचे जागांचे हस्तांतरण करुन घेउन अघोषीत झोपडपटटया

घोषीत करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. त्यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, याबाबतची प्रोसेस कार्यवाही चालु आहे.

४) मा.श्री.दिप चव्हाण - मा.श्री.विनित पाउलबुधे, सदस्य यांनी हा विषय सर्व साधारणसभेपुढे आणलेला आहे. त्यासाठी शासन दरबारी चांगला प्रयत्न केला व पाठपुरावा केला व नागरिकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न याठिकाणी सोडविलेला आहे. त्यांचे मी अभिनंदन करतो.

५) मा.श्री.शंकरराव घुले - हा प्रस्ताव सभागृहापुढे आणण्यासाठी मा.श्री.विनित पाउलबुधे, सदस्य यांनी जो पाठपुरावा केला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी निर्मलनगर, सुर्यनगर येथील नागरिकांकरीता विशेषतः मध्यमवर्गीयांकरिता जी योजना राबविली आहे त्यास मंजुरी देण्यात यावी.

विषय क्र.५ - केडगांव पाणीपुरवठा योजना .

२) मा.श्री.दिप चव्हाण - सदर विषय मंजुर करावा असे सुचविले.

तसेच मा.श्री.किशोर डागवाले, सभागृहनेते, मा.श्री.आसाराम कावरे, सदस्य यांनी विषय मंजूर करणेबाबत सुचना केली. त्याचप्रमाणे मा.श्री.शंकरराव घुले यांनी विषयाची योजना मराठीमध्ये विषद करत जावी, असे सुचविले. त्याचप्रमाणे मा.श्री.सुनिल लोंढे यांनी केडगांव भागासाठी ड्रेनेज योजना राबवावी असे सुचविले असता मा.उपमहापौर यांनी याबाबत खुलासा केला की, सदर ठिकाणची पाणी योजना होउ दया. मग ड्रेनेज योजनेचे पाहू.

२) मा.श्री.भगवान फुलसौंदर - यांनी सुचविले की, संपूर्ण पाणी योजनेसाठी एकच इंजिनिअर नेमावा. यावर मा.उपमहापौर यांनी खुलासा केला की, नवीन नेमलेल्या इंजिनिअरपैकी एक जल अभियंता नेमण्यात येईल.